श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १० अंक ५] श्रावण [श. १८५५

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... ... | १—२ |
| शिर्डीवृत्त ... ... ... ... ... | ३—६ |
| नाट्यप्रयोगाचा सविस्तर वृत्तान्त ... ... ... | ७—२१ |
| श्री संतकथामृत-अध्याय १७, १८, १९, ... | १३७-१४२ |


# विनंति.

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे की, या साली V. P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापी पाठविली नाहीं त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक--**श्रीसाईलीला**

५१ E. पार्ला रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,

**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**

---

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतनें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक —**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**

--प्रकाशक.

# अनुभव

## श्रीसाईबाबांचा अनुभव

XXXX गृहस्थ हे जी. आय् पी. रेल्वेच्या ऑफिसांत क्लार्क आहेत. त्यांनीं श्रीसाईबाबांस कधींही पहिलेलें नाहीं; परंतु त्यांचें ऑफिस पुणें येथें सन १९२४ च्या जुलै महिन्यांत बदलून आल्यावर पुणे शहरांतील श्रीसाईबाबांच्या एकनिष्ठ व वयोवृद्ध गृहस्थांच्या योगानें श्रीसाईबाबांबद्दल बरीचशी माहिती त्यांना मिळाली व कांहीं अलौकिक चमत्कार समजल्यावरून श्रीसाईबाबांचा फोटो विकत घेऊन त्यांनीं त्याची पूजाअर्चा करण्याचा नियम ठेविला. पुणें येथें पुष्कळ भक्तजनांकडे श्रीसाईबाबांची वसंतपूजा, भंडारा वगैरे कार्यक्रमास हे गृहस्थ हजर राहत असल्यामुळें साहजिकच श्रीसाईबाबांबद्दल त्यांच्या मनांत पूज्यबुद्धि व दृढभाव उत्पन्न होऊन ते स्वत: आपल्या घरींही श्रीसाईबाबांची वसंतपूजा वगैरे कार्यक्रम करवूं लागले व शिर्डीस गुरुपौर्णिमेस पुणें येथील भक्त-मंडळाबरोबर मधून मधून येऊं लागले. यामुळें त्यांना हरएक बाबतींतही श्रीसाई-बाबांच्या लीलेचे अनुभव येऊं लागले. ऑफिसांत त्यांना अचानक बढतीच्या जागेवर श्रीसाईबाबांच्या कृपेनें नेमणूक झाली; इतकेंच नव्हे, तर ज्योतिष-विषयांतही त्यांची बरीच प्रगति साईबाबांच्या कृपेनेंच झाली. त्यांना जन्मत: दम्याचा विकार होता, व तो मधून मधून उत्पन्न होत असे; परंतु वरील कालानंतर त्या रोगाचा क्वचित प्रादुर्भाव होतो. त्यांना चहाचें व सिगारेटचें व्यसन फार जबर होतें; परंतु श्रीसाईबाबांच्या कृपेनें सदरहू व्यसनें कायमचीं सुटलीं. आणखी बरेचसे अनुभव त्यांना वेळोवेळीं आलेले आहेत. परंतु ते अनुभव फार खासगी स्वरूपाचे असल्यामुळें ते प्रसिद्ध करण्याची त्यांची इच्छा नाहीं. शके १८५५ च्या गुरुपौर्णिमेस शिरडी येथें जाण्याचा त्यांचा मनोदय होता; परंतु ऑफिसांतील कामांच्या अडचणीमुळें व त्यांच्या गैरहजेरींत काम करण्यास दुसरा इसम मिळूं शकत नसल्यामुळें त्यांना रजा मिळणार नाहीं, असें त्यांच्या वरिष्ठांनीं कळविलें व त्याप्रमाणें त्यांनीं श्रीशिर्डीस येणाऱ्या एका सद्गृहस्था-

बरोबर श्रीसाईबाबांस अर्पण करण्याकरितां एक उपरणे व फुलें वगैरेही दिली व यंदा शिरडीस येतां येत नाहीं म्हणून मोठया नाखुशीनें त्यांना सांगितलें. परंतु योगायोग श्रीसाईबाबांच्या कृपेनें असा आला कीं, बुधवार ता. ५-७-१९३३ रोजीं त्यांनीं पुनः एकवार त्यांच्या वरिष्ठास निदान ३ दिवस तरी गुरुपौर्णिमेस शिरडीस जाऊन येण्याबद्दल रजा द्यावी, अशी विनंती ऑफिस सुटण्याच्या वेळीं केली, व श्रीसाईबाबांच्या कृपेनें ऑफिसांतील परिस्थिति प्रतिकूल असतांही रजा मिळाली व ते सहकुटुंब शिरडीस गुरुपौर्णिमेस येऊन गेले. वरील हकीकत त्यांनीं आम्हांस स्वतः शिरडी मुक्कामीं सांगितली.

ता. ८-७-३३ **सुंदरराव दि. नवलकर**

# श्री सा ई बा बा

## जुलई महिन्याचें शिर्डीवृत्त

जुलई महिन्यात श्रीगुरुपौर्णिमा या उत्सवास साईभक्त आले होते. त्या-शिवाय श्रीसाईसमाधीदर्शनाकरितां ७६ भक्तजन व संतप्रेमी बांधव मुंबई, सुरत, उरण, अहमदनगर, नाशिक, पुणे, भडोच, बांद्रा, ठाणे, किराणे, चिंचवड, इगरावती, धुळें, वर्धा, इंदूर, येवलें, इंदोली, धरमपूर संस्थान, बांबोरी, नेमाड संस्थान, धीरपूर या ठिकाणाहून आले होते.

यंदा गुरुपौर्णिमेच्या उत्सवा ( ता. ७ जुलई १९३३ ) करितां बरेच भक्तजन आले होते. त्या वेळीं पाऊस नसल्यामुळें नांवेचा त्रास काढावा लागला नाहीं. नांवेच्या त्रासामुळें पावसाळ्यांत बरेच भक्तजन येत नाहींत. ते इतर उत्सवाला येतात. नाशिकाहून बेलापूरपर्यंत आगगाडीचा फाटा काढण्याबद्दल मोजणी होऊन गेली आहे. तें काम सरकारी सांपत्तिक स्थितीमुळें अद्याप सुरू झालें नाहीं. हा आगगाडीचा फाटा तयार झाला म्हणजे शिर्डीस येण्यास त्रास होणार नाहीं. हा फाटा शिर्डीपासून दोनतीन मैलांच्या अंतरावरून जातो. त्यामुळें ही आगगाडी फार सोईस्कर होईल.

हा उत्सव साजरा करण्याच्या कामाची जबाबदारी नागपूरचे श्रीमंत बुटी यानीं घेतली आहे. उत्सवाकरितां येणाऱ्या भक्तजनांची व पाहुणे मंडळींची जेवणाखाण्याची वगैरे व्यवस्था ते पाहतात. श्रीसाईमंदिरांतील व श्रीद्वारका-माईतील पेट्यांतील उत्सवाच्या दिवसांतील उत्पन्न त्यांच्याकडे—उत्सव खर्चाकडे जमा होतें. त्याचप्रमाणें उत्सवाकरितां भक्तजनांनीं पाठविलेली वर्गणीही त्यांच्याकडे जमा होते.

उत्सवाचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणें झाला, मात्र काला एक दिवस आधीं करावा लागला. श्रीयुत शिरवळकरबुवा यांचीं वारकरी पद्धतीचीं दोन कीर्तनें झालीं, तीं चांगलीं झालीं. त्यांपैकीं त्यांचें काल्याचें कीर्तन फारच चांगलें झालें. गुरुपौर्णिमेच्या दिवशीं गांवांतून रथाची मिरवणूक काढली होती. दीक्षित-

वाडयाजवळ आली, तेव्हां ती मिरवणूक थांबवून कार्यक्रमाप्रमाणें गारुड सुरू झालें, तें सुमारें दोन तास चालून नंतर मिरवणूक श्रीसाईमंदिरांत गेली. रविवारच्याबद्दल शनिवारीं सकाळीं काला झाला व संध्याकाळीं गांवच्या लोकांकरितां भंडारा झाला. पुणेकर मंडळी श्रीयुत दत्तात्रय दामोदर वगैरे बरोबर गाणारी मंडळी आणतात, त्यामुळें उत्सवास अधिक शोभा येते. त्यांच्यापैकीं श्रीयुत पंडित यांचें गाणें अप्रतिम असतें. त्यांचा आवाज गोड व मधुर असल्यानें ते सर्वांना तल्लीन करून सोडतात.

शिर्डी येथील शिंपी मंडळीनें आषाढ वद्य १३ गुरुवार रोजीं श्रीनामदेवमहाराजांची पुण्यतिथि साजरी केली. भंडाऱ्याकरितां साधा भात व आंबटीचा बेत ठेवला होता व श्रीसाईसमाधीपुढें श्रीयुत शिरवळकर गवई यांनीं कीर्तन केलें.

मागील श्रीरामनवमीच्या उत्सवाच्या वेळीं ह. भ. प. दासगणूमहाराज यांनीं शिर्डी येथील शाळेचे हेडमास्तर श्रीयुत मो. स. महाजन यांजकडे गरीब विद्यार्थी व शाळेच्या विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां रु. ५ ( पांच ) ची देणगी दिली होती. तिचा विनियोग हेडमास्तरनीं खालीप्रमाणें केला आहे.

रु. २ द. वि. जोशी, विद्यार्थी, ब्राह्मण बोर्डिंग, संगमनेर, यांस पुस्तकें घेण्याकरितां दिले.

२॥~ शिर्डी शाळेंतील मुलांना वाचण्याकरितां किर्लोस्कर खबर मासिकाकरितां वर्गणी दिली.

-॥~ शिर्डी येथील शाळेंतील गरीब विद्यार्थ्यांना पाटया व पेन्सिली वांटल्या.

शिर्डी संस्थान भक्तमंडळाची १२ वी वार्षिक सभा शिर्डी येथें दीक्षितवाडयांत ता. ७ जुलई १९३४ शुक्रवार रोजीं भरली होती. शके १८५४ च्या जमाखर्चाचा आढावा व अहवाल तयार नसल्यामुळें ते कार्यकारी मंडळीच्या पुढील सभेंत मंजूर करावेत व आढाव्याची नक्कल डिस्ट्रीक्ट जज्ज अहमद-

नगर यांजकडे संस्थानच्या योजनेप्रमाणें पाठवावी, अशाबद्दलचा ठराव होऊन सभेचें काम संपलें.

ह्यानंतर संस्थानच्या कार्यकारी मंडळाची सभा झाली. त्यांत श्रीमंत बुटीवाडा याच्या जागेचा संस्थाननें भाडेचिठी देण्याचा मसुदा तयार करण्याचें काम रावबहादूर स. ब. धुमाळ, नाशिक यांजकडे सोंपविलें. त्याचप्रमाणें सभामंडप बांधण्याच्या कामाबद्दलचा पत्रव्यवहार व कागदपत्र पाहून अहवाल तयार करून तो मंडळास पुढील सभेच्या पूर्वी सादर करण्याचें कामही त्यांजवर सोंपविलें.

## जुलई महिन्यात शिर्डी येथें आलेली वर्गणी, देणगी, जिनसा वगैरे

श्रीयुत गो. भा. दातार, वकील, ठाणे–२ उदबत्ती पुडे, १ कापुर पुडका.

कु. सदाशिव (बाब) व गोरक्षकर सान्ताक्रूझ–२६ मातीच्या कुंड्या लेंडीबागेकरितां.

श्रीयुत बापुराव रा. बोराबके, शिर्डी,–४ वार कापड.

श्रीयुत सुंदरराव दि. नवलकर व सौ. शान्ताबाई, मुंबई,–१ रोजच्या पूजे-करितां मोठी पितळी घंटी.

श्रीयुत मोतीराम गजानन प्रभाकर, मुंबई–१ कीर्तनाच्या वेळीं हरिदासाच्या पायांखाली घालण्याकरितां गालिचा.

श्रीयुत गणेश गोपाळ शिरवळकर, गवई, रु. -॥ जुलई महिन्याची वर्गणी.

डॉक्टर नानासाहे खासगीवाले सिंगबेकर, रु. ३ संस्थानास देणगी.

श्रीयुत वासुदेव कृष्ण सांडू, चेंबूर, हस्तें श्री. माधवराव ब. देशपांडे रु. ५ कायमफंड.

श्रीयुत दादाजी गोपिनाथ, दादर, मुंबई,–२ पितळी समई, घंटा व सोन्याची जिवती, श्रीसाईसमाधीवर अभिषेक.

श्रीयुत शंकर गणपत शिंदे, पुणे,–१ तांदळाचें पोतें, १। मण.

श्रीयुत वामन सखाराम कामदार, देवास अभिषेक रु. १ गुरुपौर्णिमेकरितां.

,, ,, रु. १ कायमफंडास.

श्रीयुत सदाशिव चिमणाजी, धिरपूर, रु. १। कायमफंडास.

श्रीयुत यशवंत गो. जोशी, वकील, धिरपूर, रु. ५ कायमफंडास.

श्री. अवधूतबुवा, शेगांव, अभिषेक व नैवेद्य.

श्रीयुत बापाजी ब. देशपांडे, वर्धा, अभिषेक.

श्रीयुत लक्ष्मण शंकर गोरे, अभिषेक.

मुंबई ता. २ आगस्ट, १९३३.

सुं. दि. नवलकर,
ऑ. चिटणीस.

# श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

श्री. साईलीला संपादकमहाशय यांस

सप्रेम कृतानंत शिर सा. न. वि. वि. खालील मजकुरास आपल्या विबुधमान्य श्रीसाईलीलेच्या एखाद्या अंकीं कृपेनें स्थळ द्यावें अशी सविनय प्रार्थना आहे.

**श्रीशिर्डी संस्थान निधिवर्धनाकरितां ललितकलादर्श संगीत नाटक मंडळीनें ता. २-३-३२ बुधवार रोजीं रात्रौ मुंबई एल्फिन्स्टन थिएटरांत केलेल्या धर्मदाय "सत्तेचे गुलाम" नाट्यप्रयोगाचा सविस्तर वृत्तांत**

शार्दूलविक्रीडितम्

नमन

नाट्या-नाटक नाटिका-नटनटी-गानादि नाना कलाः ।<br>
नाट्यं नाटक वस्तुजातमखिलं साध्यं तथा साधनम् ।<br>
भूत्वा यः स्वयमेव नृत्यति सदा ब्रम्हांड रंगावनौ ।<br>
नित्यं नौमि नमामितं नटवरं श्री साइनाट्येश्वरम् ।

**अर्थः**—नटसंघ, नाटकें ( पांच, सहा अंकी ), नाटिका ( तीन चार अंकी ), नट, नटी, गायन, वादन, नृत्य आदिकरून बहुविध कला, त्याचप्रमाणें नाटकशास्त्र व नाटकास लागणाऱ्या यच्चयावत् सर्व वस्तु, तसेंच नाटकास लागणारीं साधनें, व त्यांपासून प्राप्त होणारें साध्य, हें सर्व आपणच होऊन स्वतः या विश्वरंगभूमीवर रात्रंदिवस थैमान करीत आहे, अशा त्या त्रिभुवनगुरु, नाटकशास्त्रप्रणेते, जगत्सूत्रधार श्रीसमर्थ साईबाबांचें निरंतर स्तवन करून त्यांचें मी वंदन करितों.

## द्रव्यनिधिवर्धनाच्या प्रामाणिक मार्गांपैकीं एक मार्ग

संस्थानद्रव्यनिधिवर्धनाचे जे नानाविध प्रामाणिक मार्ग आहेत, त्यांपैकीं नाट्यप्रयोग करून त्याचें सर्व उत[illegible] किंवा उत्पन्नाचा कांहीं भाग वर्गणी म्हणून नाटकमंडळीकडून घेणें हाही एक आहे. अपवादात्मक प्रसंग खेरीज करून यांत नाटक मंडळीस विशेष किंबहुना मुळींच झीज न सोसतां एका संस्थेस उदार देणगी देऊन अंशतः मदत केल्याचें श्रेय मिळून नांवलौकिक मिळतो. कोणत्याही व्यक्तीवर विशिष्ट बोजा न पडतां, प्रेक्षकांना सर्व दिवसभर श्रम करून थकल्याभागल्या मनाचें, खर्च केलेल्या पैशाचा योग्य मोबदला मिळाल्यामुळें, आपल्या बालगोपाल व युवतिवृंदासह, एखाद्या रात्रीं, थोडीशी सात्त्विक चैन करून, सात्त्विक रंजन करण्यास संधि मिळते. तसेंच संस्थानविश्वस्तांस, संस्थानसभेस किंवा संस्थानचालकांस आपला दैनिक उदरंभरणाचा व्यवसाय संभाळून, वेळांत वेळ काढून, हौसेनें, आनंदानें व प्रेमानें या कामीं अंतःकरणपूर्वक झटणाऱ्या इतर संस्थानप्रेमी सद्भक्त मित्रमंडळीस प्रामाणिक मार्गाच्या प्रयत्नानें आपण आपलें कर्तव्य बजावून निधिवर्धनास अंशतः मदत करीत आहों असें तात्पुरतें कां होइना, पण सात्त्विक समाधान मानण्यास जागा मिळते.

आपण हल्ली असें पाहतों कीं, नांवारूपास आलेल्या प्रख्यात—फार नाहींत—पण थोड्या नाटक मंडळींचे उदार व सत्त्वशाली मालक शेंकडों संस्थांना उत्साहानें,उदारबुद्धीनें व श्रद्धेनें मदत करितात. नाटक घेणाऱ्या मंडळीस बरीच मेहनत करावी लागते व नाटकमंडळीस बरीच झीज सोसावी लागते. तथापि ज्या वारीं नाटकास साहजिकपणेंच विशेष उत्पन्न होत नाहीं, अशा वारीं नाटक दिल्यास नाटकमंडळीचें नुकसान न होतां खेळ घेणारांचा कांहीं तरी फायदाच होतो.

## हा मार्ग पसंत नसणाऱ्या, पण बाबांच्या सद्भक्तांस प्रेमाचे दोन शब्द

तथापि कित्येकांस हा मार्ग पसंत नाहीं.निदान हल्लींच्या वेळीं तरी पसंत नाहीं. कारण काय तर परिस्थिति बिकट. कबूल.; परंतु परिस्थिति बिकट

म्हणून तोंडानें बोलण्यापलीकडे कोणी कशाचा त्याग केला आहे ? प्रत्येक खेळास नाटकगृहें, सिनेमागृहें, गच्च भरलेलीं, चहा, कॉफी, सोडावाटर, जिंजर, पिक-मी-अप्, बर्फ,सोडा, गरम मसालेदार दूध वगैरे पेयांची विक्री भरपूर,उपहारगृहांत पाहावें तों कांदा,लसूण व बटाटे घालून केलेल्या भाजीवर, कांद्याचीं भजीं, चिवडा, डाळ, लाडू, पुऱ्या वगैरे खाद्यपदार्थांवर यथेच्छ ताव मारणाऱ्या गृहस्थांची गर्दीच गर्दी,पानपट्ट्यांच्या दुकानांत व दुकानाबाहेर रस्त्यावर तांबूल-तमाखुसेवनानें हजारों आपुकमापुक युवयुवतींचीं मुखकमलें लालभडक रंगलेलीं, नानाविध तमाखुनाली (Chiroot, Cigarette, Cigar ) तोंडांत धरून मधून मधून त्यांचे झुरके मारून, गिरणी-मुखांतून किंवा अग्निशकट यंत्राच्या धुम्ररंध्रांतून निघणाऱ्या धुराच्या लोटाप्रमाणें थुंकीच्या तुषारासह, मुखांतून धुराचे लोट सोडणाऱ्या व काळोख्या रात्रीं स्वेच्छाविहार करणाऱ्या मृग-शार्दुलांच्या किलकिल्या दृष्टींतून मधून मधून चमकणाऱ्या तेजाप्रमाणें, किंवा खद्योतगुह्य स्थलप्रभेप्रमाणें, किंवा चोरकंदिलांतील अपारदर्शक रक्तदीप्ति-प्रमाणें, तमाखुनालींच्या अग्रभागीं, मधून मधून लाल प्रकाश दर्शविणाऱ्या अशा लाखों सहासात वर्षांच्या मुलांपासून तो सत्तर–पंचाहत्तर वर्षांच्या वयाच्या—गप्पा झोंकीत धनुष्यवक्र पृष्ठ ऐटबाज पोशाखांत अनंकुरित, कृष्ण, धवल किंवा छिन्नकूर्चक, हातांत झोकदार वंश किंवा वेत्रयष्ट्या घेऊन चालणाऱ्या जरठ विलासी जनांनीं रस्ते फुलून निघालेले, मस्तकावरील मुद्दाम राखून ठेवलेल्या जंगलांतील पाळीव कृष्ण श्वेत कुटिल कुंतलांवर वर्षाव करण्याकरितां सौगंधिक तेलें, केस विंचरून त्यांचे नित्यश: भांग पाडण्याकरितां फण्या किंवा कंगवे, खालीं आलेले कुंतलगुच्छ व पाडलेले भांग यांनीं युक्त, चेहेरा पाहण्याकरितां आरसे, कानांत घालण्याकरितां अत्तराचे फाये व अंगास चोपडण्याकरितां अत्तरांच्या पेट्या, कपड्यावर शिंपडण्याकरितां लव्हेंडर व ओटोदिलबहारादि अत्तरें खरेदी करण्यांत, ह्या व अशा प्रकारच्या इतर कोट्यवधि भिकार व बेगडी चैनी करण्याकरितां पैसा खर्च करण्यास हल्लींची परिस्थिति बिकट नाहीं. मनरंजन, कर्तव्यप्रेम, परमार्थ, सद्गुरुसेवा होऊन

दोन दिडक्या धर्मकृत्याकडे जाण्याचा सुसंधि सुदैवानें आल्यास मात्र हल्लींची परिस्थिति बिकट !

असो. ज्या संस्थेकरितां खेळ घ्यावयाचा त्या संस्थेवर व तिच्या चालकां-वर कांहीं तरी भक्तिप्रेम असल्याशिवाय धर्मदाय खेळाचीं तिकिटें सहसा कोणी विकत घेत नाहींत, व ज्यांना खेळ पाहण्याची नेहमींची आवड किंवा व्यसन असतें तो खेळ धर्मदायक आहे किंवा नाटकमंडळीच्या नित्यक्रमापैकीं आहे, याची चौकशी करण्याची तसदी न घेतां, बहुतकरून प्रत्येक खेळास जातातच.

जगतांतील, देशांतील, प्रांतांतील, किंवा गांवांतील प्रत्येक धार्मिक किंवा सार्वजनिक कार्य मी एकटाच स्वतःच्या द्रव्यबलावर, बुद्धिबलावर व शक्तिबलावर करीन म्हणून कोणी घमेंड मारीत असेल, तर ती व्यर्थ आहे. कांहीं भाग्यशालि हरीचे लाल अवनितलावर कदाचित् निघतील, नाहीं असे नाहीं. पण ते केवळ हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेंच ! अशा प्रकारचीं बहु-तेक सर्व कार्यें एकमेकांच्या मदतीनें व सहकारितेनेंच केलीं जातात. यांत नाक मुरडण्यासारखें, खेद मानण्यासारखें अगर नांवें ठेवण्यासारखें कांहींच नाहीं.

हा मार्ग प्रामाणिक आहे, व कोणत्याही प्रामाणिक मार्गानें श्रीसाईनाथ-महाराजांच्या संस्थान-द्रव्यनिधिवर्धनाकडे पैसा जमविल्यास तो न्याय्य व श्रेय-स्करच आहे.

संस्थाप्रेमी किंवा संस्थाचालकप्रेमी सद्भक्त कोणत्याही स्थितींत व कोण-त्याही प्रसंगीं बाबांच्या कार्यास कमीजास्त प्रमाणांत हातभार लावून मदत करतातच, असा माझा स्वानुभव आहे. मदत करण्याची इच्छा नसलेल्या गृह-स्थांस परिस्थितीच काय, पण वाटेल तितक्या मनमानेल त्या सबबी व पळवाटा असतात. परंतु आपल्यास तें पाहावयाचें नाहीं.

## बाबांचीच प्रेरणा व इच्छा

" कर्मण्येवाधिकारस्ते " या श्रीमद्भगवद्गीतेंतील अमोल अनर्घ्य श्रीकृष्ण परमात्मोक्तीवर लक्ष ठेवून आपापलें कर्तव्य बजावावयाचें आहे व आप

आपलें कर्तव्य बजावूं लागलों की, श्रीसद्गुरुमाउली आपल्यास साहाय्य करण्यास निरंतर तयार असतेच. इतकेंच नव्हे, तर तिच्याच मनांत आल्यास आपण नाहीं म्हणून तरी चालणार कसें ?

( अभंग )

**आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना**

—श्रीतुकाराममहाराज

किंवा

( वंशस्थवृत्तम् )

**लभेत वा प्रार्थयिता न वा श्रियम् ।**
**श्रिया दुरापः कथमीप्सितो भवेत् ।**

अर्थः—श्रीची ( ऐश्वर्य, संपत्ति ) इच्छा करणाऱ्या मानवास श्री मिळेल किंवा मिळणार नाहीं. परंतु श्रीनेंच जर एखाद्या मानवाच्या प्राप्तीची इच्छा केली तर तिला तो प्राप्त होणार नाहीं असें कसें होईल ?

तद्वत् एखादें कार्य करण्याचें किंवा घडवून आणण्याचें एखाद्या मनुष्याच्या मनांत आल्यास तें त्याच्या हातून होईल किंवा होणार नाहीं, त्याच्यामार्फत घडून येईल किंवा घडून येणार नाहीं. परंतु विश्वपट रंगविणाऱ्या अनंत व अमोघ शक्तीच्या इंद्रजाल श्रीसाइदेवजींच्या मनांत एखादी गोष्ट घडवून आणण्याचें आल्यास तिच्यांत अडथळा अगर व्यत्यय कोण आणणार ? किंवा ती घडून येणार नाहीं असें कसें होईल ?

## मतभेद

आमच्या उपरिनिर्दिष्ट नाटकाचीही गोष्ट तशीच आहे. केव्हांही झालें तरी चार मंडळी प्रतिकूल असावयाचीच. सर्वांनाच एक गोष्ट पसंत पडते असें नाहीं. वादविवाद व्हावयाचे, परंतु सर्वांचें ध्येय ज्या ठिकाणीं एकच

असतें, त्या ठिकाणी यद्यपि वादविवाद झाले तरी एकमत लवकर होतें शेवट गोड झाला म्हणजे सर्वच आपापला भेदभाव विसरून जाऊन एका आनंदाचे वांटेकरी होतात.

## पूर्वी घेतलेल्या "राक्षसी महत्त्वाकांक्षा" खेळाची हकीकत

पूर्वी याच सुप्रसिद्ध नाटकमंडळीच्या दिलदार व सत्त्वशाली मालका कडून " राक्षसी महत्त्वाकांक्षा " या नांवाचा लोकप्रिय खेळ बुधवा ता. २५-११-२५ रोजीं रात्रीं मुंबई-ग्रँटरोड थिएटरांत घेण्याचें ठरविलें, त्या वेळींही खेळाच्या नांवाबद्दल, वाराबद्दल, थिएटराबद्दल व नाटकमंडळीच्या खर्चा बद्दल कित्येक दिवस ऊहापोह चालला होता. कै. काकासाहेब दीक्षित म्हणत, " राक्षसी महत्त्वाकांक्षा " हें नांव भयंकर आहे व तें आपल्या संस्थेशीं जो नये. म्हणून तें बदलून जें नांव आपल्या संस्थेस शोभेल अशा दुसऱ्या एखाद्या गोंडस नांवाचा खेळ या मंडळीकडून घ्या. कै. अण्णासाहेब दाभोळकर म्हणत कीं, बुधवार बदलून शनिवार किंवा रविवार घ्या. कोणी म्हणत कीं, हें थिए टर बदलून दुसरें थिएटर घ्या व कोणी म्हणत कीं, नाटकमंडळीच्या खर्चाच रक्कम अगोदर ठरवून घ्या.

नाटकमंडळीस विचारतां ठरलेल्या कार्यक्रमांत फेरफार करण्याचें ती कबूल करीना. मलाही वाटे, कीं फेरफार काय म्हणून करावा? येऊनजाऊन पुष्कळ पैसे मिळावे हाच हेतु ना? मग परमात्म्याच्या मनांत असल्यावर तो याच योजनेंत इष्ट प्राप्ती करून देणार नाहीं का? शेवटीं खेळ तोच, वार तोच, थिएटर तेंच असून छापलेल्या एकंदर १६२९ रुपयांच्या तिकिटांपैकीं १५०० रुपयांचीं तिकिटें बाहेरच्या बाहेर उत्साही काम करणाऱ्या सद्भक्त मित्रमंडळी मार्फत खपून नाटकगृहाच्या दारावर फक्त १२९ रुपयांचींच तिकिटें विकण्या करितां देण्यांत आलीं. तीं सर्व हलक्या दराचीं असल्यामुळें हां हां म्हणतां तास दोन तासांत खपून गेलीं व मोठ्या दराच्या तिकिटांची मागणी सुरू झाली; परं नाइलाजास्तव कोणाचीच मागणी पुरी करतां येईना. थिएटर पूर्वी कधीं भरलें नव्हतें इतकें गच्च भरलें. कोणत्याही नवीन गृहस्थास कोणत्याही दराच्या

तिकिटाच्या जाग्यावर बसावयास जागा रिकामी नाहीं. नाटकभद्राची धारणाशक्तीच खलास झाली ! बाबांचें नाटक म्हणून मुद्दाम पाहण्यास आलेल्या शेकडों भक्तांची निराशा झाली. शेवटीं कित्येकांनीं तिकिटें घेण्याकरतां आणिलेले पैसे तसेच आमच्याजवळ दिले व कित्येकांनीं श्री.पेंढरकरांचें आंत बाजूला उभे राहून फक्त एकच पद ऐकून तिकिटाकरितां आणिलेले पैसे आमच्या स्वाधीन केले. अशा प्रकारें आलेल्या या पैशांची रक्कमही जवळ जवळ शंभरापेक्षां जास्त झाली.

नाटक मंडळीच्या मालकांनीं खर्चाची एक पैही आमच्याकडून घेतली नाहीं. जमलेली सर्व रक्कम ( अजमासें १७५० रुपये ) अगदीं निःस्वार्थबुद्धीनें आम्हांसच दिली. सर्वांनाच आनंद झाला. केवढी अगाध लीला ही ! ! हा मार्ग बाबांनाच न्यायाचा वाटला नसता, तर ते यांत इतकें कल्पनातीत यश देते ? निःसंशय न देते.

## हल्लींच्या "सत्तेचे गुलाम" खेळाची हकीकत

अशा प्रकारें संस्थानास कायमचे ऋणी करून ठेवणाऱ्या नाटकमंडळीकडून पुन्हा एक खेळ घेऊन संस्थाननिधिवर्धनांत आणखी एक वेळ अंशतः तरी भर टाकावी असा विचार अलीकडे २-३ वर्षे मनांत घोळूं लागला. परंतु तो सुयोग लवकर जुळून येईना. दोनचार वेळा नाटकमंडळीच्या मालकांच्या,बाबांच्या चरणीं दृढ प्रेम व पूर्ण निष्ठा असलेल्या मातुःश्री श्रीमती राधाबाईजवळ व खुद्द मालक श्रीयुत व्यंकटराव यांच्याजवळ गोष्ट काढली. जबाब अनुकूल, परंतु कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें बेत पुढें ढकलावा लागे. झालेली प्रेरणा मागें खेंचली जाईना. व कार्यही लवकर होईना. काय होणें-असेल तें होवो, आज नाटकाचा खेळ, थिएटर व तारीख कायम करून यावयाचें, असा निश्चय करून बाबांच्या चरणावर मस्तक ठेवून एक दिवशीं मुंबईस गेलों. व्यंकटराव व राधाबाई या उभयतांनीं सर्व कांहीं कबूल केलें. तारीख, खेळ, थिएटर मुक्रर करून तिकिटें छापण्याचीही तजवीज ताबडतोब झाली. अवधि फक्त एक महिन्याचाच उरला.

## निरुत्साह व निराशांचे ढग

परंतु पुन्हा पूर्वीप्रमाणें आपापल्या मंडळीकडून जितकें भरपूर प्रोत्साहन मिळावें तितकें मिळेना. प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर खिन्नतेची व प्रतिकूलतेची छटा दिसूं लागली. अशा बिकट परिस्थितींत तुम्हीं हें काय आरंभिलें आहे, असे शब्द प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें श्रोतृपथावर येऊन आदळूं लागले. तथापि आलेली ऊर्मी व झालेली प्रेरणा कांहीं केल्या मागें हटेना, उत्साहभंगही होईना व स्वस्थही बसवेना. शेवटीं जें होईल तें होवो, कोणी मदत करो वा न करो खेळ तर घ्यावयाचा,असा मनाचा पूर्ण निग्रह करून गेल्या जानेवारींत तिकिटें छापून आणवून त्यांची वांटणी करण्याकरतां सांताक्रूझ येथें गेलों.श्री. बाबासाहेब तर्खड,श्री.सुंदरराव नवलकर, श्री.मोरेश्वरराव प्रधान व वसंतराव गोरक्षकर उपस्थित होते.ज्यांनीं जितकीं सांगितलीं तितकीं तिकिटें त्यांच्याकडे ठेवून बाकीचीं मी आपल्याकडे ठेविलीं,व तसाच घाईघाईनें डहाणू ,पालघर,चिंचणी वगैरे गांवाकडे कै.दामोदर घन:शाम उर्फ आण्णा बाबरे चिंचणकर यांनीं श्रीशिर्डी संस्थानकडे दिलेल्या जमिनींच्या उत्पन्नाच्या वसुलाच्या कामाकरितां व मौजे वेढे, ता. पालघर येथील जमिनीच्या कबजासंबंधानें डहाणू कोर्टांत दिलेल्या फिर्यादीच्या तारखेची व कोर्टांत दाखल करण्याच्या कागदपत्रांची चौकशी करण्याकरितां तावडतोब निघून गेलों.सातआठ दिवसांनीं तिकडून परत आल्यावर पाहतों तो तिकिटें खपविण्याच्या कामीं सर्व ठिकाणीं शैथिल्य दिसून आलें व आपल्या तंगड्या आपल्याच गळ्यांत येतात कीं काय, अशी भीति वाटूं लागली. कारण वरील नाटक मंडळीच्या ''राक्षसी महत्त्वाकांक्षा'' ह्या नाटकाचा खेळ घेतल्या नंतर कांहीं महिन्यांनीं ठाणे येथील एका खासगी शृंगारप्रिय, नूतन, अल्हाद भारत नाटक समाजाच्या अग्रणींनीं,याच संस्थानच्या निधिवर्धनाकडे 'खर्चवेंच जाऊन त्यांनीं बसविलेल्या एका खेळाचें उत्पन्न देण्याची उत्कटेच्छा प्रदर्शित केली. नव्हे, आम्ही त्यांचा खेळ घ्यावा म्हणून आग्रहपूर्वक विनंती केली.सदर मंडळी नोकरपेशाची असल्यामुळें आपापलें नेहमींचे पोटापाण्याचे व्यवसाय

संभाळून केवळ आवडीखातर व नाटकाकरतां विकत घेतलेल्या ( आपआपसांत वर्गणी करून ) सामानाच्या अंशतः खर्चापुरते पैसे मिळविण्याकरितां, या विषयाचा फावल्या वेळेंत अभ्यास करून वर्षांतून बगवशिल्यानें चारदोन खेळ करणारी होती. या नवशिक्या व अप्रसिद्ध मंडळीचा उत्साहभंग होऊं नये, व त्यांना थोडें तरी उत्तेजन मिळावें म्हणून त्या वेळीं तेथें हजर असलेल्या कै. काकासाहेब दीक्षितादि संस्थानसभा सदस्य-संमतीनें, त्यांचा एक खेळ घेण्याचें कबूल केलें. परंतु त्यांच्या खेळाचीं तिकिटें खपविण्याकरितां कोणाकडे कोण प्रार्थना करण्यास जाणार ?

## ठाणें येथील एका नाटकाच्या खेळाची हकीकत

निवळ बाबांवर श्रद्धा ठेवून नाटकाच्या खेळाच्या दिवशीं नाटकगृहद्वारावर काय तिकिटें खपतील तीं खपतील, असें म्हणून हात जोडून स्वस्थ बसण्यापलीकडे दुसरा मार्गच नव्हता. ठरल्या तारखेस ठाणें नाटकगृहांत नाटक झालें. उत्पन्न झालेली रकम खर्चाच्या रकमेपेक्षां कमी. गळ्यांत धोंगडें आलें ! अंतःकरणाचा व्यापार झाला. संस्थान सभासदस्य म्हणूं लागले कीं, झालेलें उत्पन्न खर्च वजा जाऊन जरी अगदीं थोडें राहिलें असतें, तरी तें आम्ही स्वीकारलें असतें, किंवा जमा व खर्च यांची रमारमी झाली असती तरी आम्ही बोललों नसतों. पण तुमची ही नुकसानीची रक्कम भरावी कोणी ? नाटकवाले म्हणूं लागले कीं, काय वाटेल तें करा, पण आमचा खर्च आम्हास पुरापुर द्या. प्रेक्षक जमले नाहींत, म्हणून उत्पन्न झालें नाहीं, त्यास आम्ही काय करावें ? तुमचें कॅन्व्हासिंगच नाहीं, मग प्रेक्षक तरी येणार कसे ! सरासरी मूर्ख ठरलों मी. दुर्दैव ! बाबांचा धांवा केला. नाटकमंडळीचेंही नुकसान होऊं नये व संस्थानास तर पैसेही मुळींच लागूं नये ही इच्छा. बाबांचें नाम हाच आपला आधार. त्या आधारास चिकटून राहिलों. मार्ग सुचला. कांहीं सन्मित्रांनीं मदत केली, खर्च जाऊन दहाच रुपये शिल्लक राहिले. तेवढेच संस्थाननिधिवर्धनाकडे दिले ! बाबांनीं अब्रू राखली.

## कुर्ले येथील एका नाटकाच्या खेळाची हकीकत

नंतर लागलीच कांहीं दिवसांनीं कुर्ल्याच्या शृंगारप्रिय, नूतन अप्रसिद्ध नाटकप्रेमी मंडळींनीं खर्चवेंच जाऊन जापण बसविलेल्या एका खेळाचें उत्पन्न याच संस्थाननिधिवर्धनाकडे धर्मदाय म्हणून देण्याची आपली प्रबल व अनावर इच्छा प्रगट केली. एकदा अद्दल घडली, ठेंच लागली, ठोकर बसली, आतां पुन्हा अशा भानगडींत पडूं नये, ही साधी शिकवण घ्यावयाची ती न घेतां, बाबांच्या आधारावर, द्रव्यलोभास व आशानादास बळी पडून याही मंडळीचा एक खेळ कल्याण येथें "तुकाराम" नाटकगृहांत घेण्याचें मीं कबूल केलें व याप्रमाणें खेळ घेतला. खर्चवेंच जाऊन १०० शंभर रुपये राहिले. ते संस्थान खजिनदारांकडे पाठवून दिले. अब्रू बचावली. बाबांच्या अघटित घटनेचें कौतुक वाटलें. प्रेरणा कां करतात, निराशेच्या बावटळी कां उठवतात व सांवरून कसे घेतात ही लीला त्यांची त्यांनाच अवगत.

हें सर्व कथन करण्याचें कारण प्रत्येक सत्कार्यांत निराशांच्या काळ्याकुट्ट ढगांतून आशारूपी सूर्यनारायणाच्या कोमल किरणांचा प्रकाश होत असतो. अग्निनारायण जसा प्रथम धूमांनीं आच्छादित असतो, तसा प्रत्येक सत्कार्यारंभ दोषांनीं, दुःखानीं किंवा संकटांनीं आवृत असतो. ( सर्वारंभा:हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता: —श्रीमद्भगवद्गीता )

## हल्लींच्या खेळाच्या वेळीं काम करणाऱ्या मंडळींचा उत्साह व आशेचीं बालकिरणें

असो. निरुत्साह न होतां "राक्षसी महत्त्वाकांक्षा" नाटकाच्या वेळी खटपट करणाऱ्या उद्यमप्रिय,सदैवोत्साही सन्मित्रभक्त मंडळीस पाचारण करून सांताक्रूझ येथें रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांच्या वाड्यांत पुन्हा एक सभा भरविली. श्रीबाबासाहेब तर्खड, श्री. सुंदरराव नवलकर, श्री. मोरेश्वरराव प्रधान, त्यांचे चिरंजीव सुमनराव, विनायक आपाजी वैद्य, नारायण जनार्दन तेंडुलकर, बाबूराव दीक्षित, बाबूराव दाभोळकर, वसंतराव गोरक्षकर व मुंबई ॲडव्हो-

केट नवलकर वगैरे मंडळी उपस्थित होती. पूर्वीप्रमाणेंच, बुधवार नको, "सोन्याचा कळस" हें नाटक घ्या, खेळाचें सर्वच उत्पन्न ( खर्च न घेतां ) नाटकमंडळींनीं संस्थानास द्यावें, नाहीं तर ती मंडळी काय घेणार हें आगाऊच ठरवून घ्यावें, वगैरे चर्चा सुरू झाली. वार बदलत नाहीं. "सत्तेचे गुलाम" लोकप्रिय नाटक आहे. तें बदलून त्याच्याऐवजीं "सोन्याचा कळस" मिळत नाहीं. तें नवीन नाटक आहे. त्यास खर्च फार येतो, तेंच नाटक नाटकमंडळीच्या उत्पन्नाची बाब असते. असें नवें नाटक सहसा कोणी धर्मदाय म्हणून देत नाहीं. कारण त्याला कॅन्व्हासिंगची जरूरी नसते. खर्चवेचाची पैही न घेतां राक्षसी महत्त्वाकांक्षेचें सर्व उत्पन्न या मंडळींनीं एकवार दिलें आहे, करितां या वेळीं तुम्ही तसेंच करा,असें त्यांना सांगणें अप्रशस्त, अनुदार व अनुचित होईल. मात्र मी सांगेन तितकीच रक्कम ती मंडळी घेईल. अगाऊ ठराव करण्याचें कारण नाहीं. हें म्हणणें सर्वांस पटलें. उपस्थित असलेल्या मंडळीच्या वदनांबुजावर थोडी प्रसन्नतेची छटा दिसूं लागली. त्यांनीं कमरा बांधिल्या. तिकिटांची पुन्हा आलेल्या मंडळींत वांटणी झाली.

ठाण्यास येऊन पाहतों तों चि. बाबूराव, भय्याराव व बसंतराव देव, शांतारामभाऊ तेलंग, मोरेश्वर दामोदर ऊर्फ नाना जोशी, ही मंडळी सज्ज झाली. कुर्ल्यास मगन तात्या दवे, माधवजी झीणा, पांडोबा खबणेकर, फदमसाहेब, बाळासाहेब पाटणकर वकील, मुलुंड येथें नेरकर वगैरे मंडळींनीं चांगलेंच मनावर घेतलें. दादर येथें राहणारे दत्तात्रय मार्तंड प्रधान यांनीं बरीच कामगिरी करण्याचें कबूल केलें.

## अगदीं पूर्ण नसलें, तरी जवळ जवळ पूर्ण यश

मला पुष्कळ हिंमत आली. अवघ्या १५-२० दिवसांच्या अवधींत अजमासें ११३५-६ चीं तिकिटें खपलीं व तारीख २-३-३२ रोजीं रात्रीं नाटकगृहाच्या दारावर २०९ रुपयांचीं तिकिटें खपलीं. म्हणजे एकंदर तिकिटविक्री १३४४-६-० ची झाली.

या नाटकाचा प्रयोग मुंबई एल्फिन्स्टन थिएटरांत झाला. विकत घेतलल्या तिकिटांपैकीं बहुतेक सर्व मंडळी स्वतःच आली होती.

"राक्षसी महत्त्वाकांक्षा." नाटक प्रयोगाप्रमाणें या वेळीं प्रेक्षकांच्या गर्दीनें नाटकगृह साहजिकच फुलून निघालें नव्हतें व त्या वेळीं जसें उत्पन्न झालें तसें या वेळीं जरी झालें, नाहीं, तथापि परिस्थित्यनुरूप जें झालें तें खात्रीनेंच निराशाजनक म्हणतां येणार नाहीं इतकेंच नव्हे, पण जें झालें तें चांगलेंच झालें असेंच कोणी तिऱ्हाइत निःपक्षपाती सद्भक्त म्हणेल.

अपयशाची कल्पना मला कधींच शिवली नाहीं. उलट असेंच वाटे कीं, संस्थाननिधिवर्धनाकरितां अलीकडे आपल्याकडून कांहींच प्रयत्न झाला नाहीं व श्रीबाबांच्या मनांत जर या मार्गाचें पुन्हा अवलंबन करून निधींत अंशतः भर टाकावी असें नसतें, तर त्यांनीं मला ही प्रेरणा तरी कां केली असती? त्या अर्थी या दिशेनें प्रयत्न करावा अशीच त्यांची इच्छा दिसते. बिकट परिस्थितींतही त्यांनीं अंगीकृत कार्यांत इतकें यश दिलें ही त्यांचीच अघटित घटना, त्यांचीच अगम्य लीला, त्यांचीच अतर्क्य करामत ! ! !

असो. आतां आपण तिकिटांच्या जमाखर्चाकडे वळूं.

## तिकिटांची जमा, विक्री व शिल्लक

| एकंदर तिकिटें छापलीं. | | | पैकीं खपलीं. | | | शिल्लक राहिलीं. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दर | संख्या | किंमत | दर | संख्या | किंमत | दर | संख्या | किंमत |
| रु. आ. पै. | | रु. आ. पै. | रु. आ. पै. | | रु. आ. पै. | रु. आ. पै. | | रु. आ. पै. |
| ५-१२-० | ५६ | ३२२-०-० | | ३४ | १९५-८-० | | २२ | १२६-८-० |
| ४-८-० | ५८ | २६१-०-० | | ४० | १८०-०-० | | १८ | ८१-०-० |
| ३-६-० | ७५ | २५३-२-० | | ५८ | १९५-१२-० | | १७ | ५७-६-० |
| २-१२-० | १०२ | २८०-८-० | | ९४ | २५८-८-० | | ८ | २२-०-० |
| २-४-० | १०० | २२५-०-० | | ८० | १८०-०-० | | २० | ४५-०-० |
| १-१२-० | १०७ | १८७-४-० | | १०६ | १८५-८-० | | १ | १-१२-० |
| १-२-० | ५९ | ६६-६-० | | ५९ | ६६-६-० | | ० | ०-०-० |
| १-०-० | ७० | ७०-०-० | | २७ | २७-०-० | | ४३ | ४३-०-० |
| ०-९-० | ६० | ३३-१२-० | | ६० | ३३-१२-० | | ० | ०-०-० |
| ०-९-० | ३९ | २१-१५-० | | ३९ | २१-१५-० | | ० | ०-०-० |
| | ७२६ | १७२०-१५-० | | ५९७ | १३४४-५-० | | १२९ | ३७६-१०-० |

वरील पत्रकावरून दिसून येईल कीं, एकंदर १७२०-१५-० किमतीच्या छापलेल्या तिकिटांपैकीं १३४४-५-० किंमतीचीं तिकिटें खपलीं; शिवाय कित्येक सन्मित्र भक्तमंडळींनीं खेळ होण्यापूर्वी व झाल्यानंतर खेळास मदत म्हणून परिचूर्ण लहान लहान देणग्या दिल्या त्या निराळ्या.

त्याचप्रमाणें या कामीं खर्च होऊन नुकसानही सोसावें लागलें आहे; याचें कारण पुढें देतों.

तिकिटें खपविण्याकरितां तिकिटांची वांटणी पुष्कळ मंडळींत केली होती; तथापि हिशोबाच्या सोईसाठीं व पैशाच्या वसुलासाठीं श्रीयुत सुंदरराव नवलकर व श्री. देव यांच्यावर मुख्यत: जबाबदारी ठेविली होती.

## कोणामार्फत किती रक्कम वसूल झाली ?

| | रु. आ. पै. |
|---|---|
| (१) श्री. सुंदरराव दिनानाथ नवलकर, मुंबईमार्फत: | ५१४—६—० |
| (२) ता. २-३-३२ रोजीं रात्रीं नाटकगृहद्वारावर विकलेल्या तिकिटांची रक्कम नाटक मंडळीमार्फत: | २०९—०—० |
| (३) श्री. बालकृष्ण विश्वनाथ देव, ठाणें, यांच्यामार्फत: | ६२०—१५—० |
| (४) नाटक पाहाण्यास न येतां नाटकास मदत म्हणून कित्येक सद्गृहस्थांनीं दिलेल्या परिचूर्ण लहान लहान देणग्यांची आलेली व भर घातलेली रक्कम श्री. देव यांच्यामार्फत | ८०—७—३ |
| एकंदर जमा रु. | १४२४—१२—३ |

## रक्कम कोणाच्यामार्फत किती खर्च झाली ?

श्री. ललितकलादर्श संगीत नाटक मंडळीस दिलेली रक्कम

श्री. देवमार्फत:—३००—०—०

जाहिरातींचा खर्च श्री. नवलकरमार्फत:— केसरी, नवाकाळ, केसरे हिंद,

१७-८-०, २५-०-०, १५-०-० एकंदर खर्च रु. ५७—८—०

रेल्वे स्पेशल ट्रेन घेण्यांत आलेलें नुकसान श्रीबाबासाहेबांमार्फत रु.६६—४—३

याप्रमाणें एकंदर खर्च ४२३-१२-३

जमेंतून खर्च वजा जातां संस्थानद्रव्य-निधीवर्धनाकरितां दिलेली रक्कम :—१००१—०—०

## गळ्यांत आलेलें घोंगडें व सोसावें लागलेलें नुकसान ! स्पेशल गाडीची व्यवस्था

या वेळीं खरोखर जर कोणती बाब गळ्यांत आली असेल तर ती बी. बी. सी. आय्. रेल्वेनें आलेल्या नाटकप्रेमी सद्भक्तांच्या,ता.२-३-३२ रोजीं पहाटेस परत जाण्यासाठीं खास केलेल्या स्पेशल ट्रेनच्या व्यवस्थेची होय. या वेळीं रेल्वेकडून घालण्यांत आलेली अट पूर्वी घेतलेल्या " राक्षसी महत्त्वाकांक्षा " खेळाच्या वेळच्या अटीपेक्षां निराळी होती. त्या ट्रेनकरितां फक्त १५० तिकिटें खपलीं पाहिजेत, एवढीच त्या वेळीं अट होती व ती त्या वेळीं सहज पुरी झालीही. या वेळची जर अशी होती कीं, प्रथम आम्हीं ७५ रुपये रेल्वे-ऑफिसांत अनामत ठेवावे व या रकमेपेक्षां जाणाऱ्या-येणाऱ्या उतारूंच्या तिकिटांची रक्कम जास्त झाली तर ती आम्ही ठेवावी, व कमी झाली तर तितकी आम्ही भरून देऊन ७५ रुपयांची रक्कम रेल्वेस पुरी करून द्यावी.हा डावपेच पूर्वी लक्षांतही आला नव्हता. ७५ रुपयांपेक्षां ट्रेन-तिकिटांची रक्कम कमी येईल अशी कल्पना नव्हती. रिटर्न तिकिटांचें उत्पन्न मजुरा मिळणार नाही असें वाटलें नव्हतें.रिटर्न तिकिटें कोणी त्या रात्रीं काढूं नयेत अशी सूचना देण्यास

पुरेसा अवधि नव्हता. यामुळें ट्रेनतिकिटांची रक्कम अवघी ८–११–९ धरण्यांत आली व तिला भरतीला ७५ रुपयांपैकीं ६६-४-३ घेऊन आमच्याकडे फक्त ८–११–९ पाठविण्यांत आले. म्हणजे आमच्या माथीं नाहक ६६–४–३ रुपयें रकमेचा बोजा बसला; पण त्यास इलाज नाहीं. यांत दोष कोणाचाच नव्हता. सोय तर करावयास पाहिजेच होती.

परंतु मागाहून असें लक्षांत आलें कीं सोय नसती केली तरी झालें असतें. जी. आय. पी. रेल्वेनें येणाऱ्या भक्तांची पूर्वीं व या वेळीं मुळींच सोय करण्यांत आली नव्हती. रेल्वे स्पेशल ट्रेनपेक्षां ८-१० इसमांनीं मिळून जातांयेतांच्या मोटरी केल्या तर त्या सर्व बाजूंनीं सोईस्कर पडतात, असा अनुभव आला. असो. पण आतां काय त्याचें ? हीही बाबांचीच लीला ! सर्व कांहीं आमच्याच इच्छेप्रमाणें कां व्हावें ? त्यांच्याच इच्छेंत आम्ही आपली इच्छा समरस करून घेतली पाहिजे, हेंच तत्त्व यावरून सिद्ध होत नाहीं काय ?

## खेळाकरितां जास्त मंजूर करून आणिलेली वेळ

खेळ खलास होण्याची वेळ नेहमीं रात्रीं १ वाजण्याची असते; पण पूर्वीप्रमाणें या वेळीं मुद्दाम मे. पोलिस कमिशनरसाहेबबहादुर, मुंबई, यांना विनंती करून ती वेळ रात्रीं २ वाजेपर्यंत त्यांचेकडून मंजूर करून आणण्यांत आली. यासंबंधीं सर्व पत्रव्यवहार रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान बी. ए., एलएल. बी., वकील, मुंबई, हायकोर्ट, यांनीं ता. २५-२-३२ पासून सुरू केला होता.

## भरलेला इन्कम् टॅक्स परत मिळाला.

झालेल्या उत्पन्नावर रु. १६५-१५-० इनकमटॅक्स म्हणून कापण्यांत आला होता. तो परत मिळण्याकरतां ता. ३-३-३२ रोजीं म्हणजे खेळाच्या लागलीच दुसऱ्या दिवशीं रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांनीं सर्व शिर्डी संस्थान विश्वस्तांच्या वतीनें एक इंग्रजी अर्ज मे. पोलिसकमिशनरसाहेब, मुंबई, यांच्याकडे रवाना केला. परंतु त्यासंबंधानें बराच पत्रव्यवहार होऊन मे महिना अखेर सदर रक्कम परत मिळण्याची मंजुरी साहेबबहादुर यांच्या ऑफिसांत होऊ

पुढील तजविजीकरितां तें काम मे. कलेक्टरसाहेब, मुंबई, यांच्याकडे गेलें. रिफंड फॉर्मावर सही करण्याकरितां कामाच्या कोणत्याही दिवशीं दुपारीं १२ पासून ३ पर्यंत आमच्या ऑफिसांत यावें अशी कलेक्टरसाहेबांकडून मला लेखी समज मिळाली. रिफंड फॉर्मावर सही करून देऊन पैसे मिळतां मिळतां जुलई-अखेर आली. पैसे परत मिळाले.

## आभार

या सर्व यशाचें श्रेय श्री शिरडी संस्थानचे सेक्रेटरी श्री. सुंदरराव नवलकर, मुंबई; संस्थानचे खजिनदार बाबासाहेब तर्खड, बांद्रे; रा. ब. मोरेश्वरराव प्रधान; संस्थान विश्वस्त, सांताक्रूझ, त्यांचे चिरंजीव सुमनराव, नारायणराव तेंडुलकर, मुंबई; विनायकराव वैद्य, अंधेरी; बाबूराव दीक्षित, विलेपारलें; बाबूराव दाभोळकर, बांद्रें; वसंतराव गोरक्षकर, सान्ताक्रुझ बाबूराव-भय्याराव-वसंतराव देव, टाणें; शांतारामभाऊ तेलंग, ठाणें; मोरेश्वर दामोदर ऊर्फ नाना जोशी, ठाणें; मगनतात्या दवे; माधवजी झोणा; पांडोबा खळणेकर; कदमसाहेब; पाटणकर वकीलसाहेब, कुर्ले; दत्तात्रय मार्तंड प्रधान, दादर; नेरकर, मुलुंड आदिकरून मंडळींना आहे. शिरडीसंस्थानसभेतर्फे मी या वरील मंडळींचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

## आभार

वरील मंडळीच्या शब्दास मान देऊन ज्या सद्गृहस्थांनीं त्यांच्याकडून आगाऊ तिकिटें विकत घेतलीं, तसेंच ज्यांनीं आयत्या वेळीं नाटकगृहाच्या द्वारावर तिकिटें घेतलीं, व नाटकगृह सुशोभित केलें, तसेंच ज्या सद्गृहस्थांनीं व सन्मित्रांनीं नाटकास न येतां व नाटकाची तिकिटें विकत न घेतां नाटकास मदत म्हणून नुसतेच पैसे मजकडे पाठवून दिले, याबद्दल मी या सर्व मंडळींचा अत्यंत आभारी आहें.

## अभिनंदन

तसेंच ललितकलादर्श संगीत नाटक मंडळीचे आनंदी, मनमिळाऊ उत्साही व सत्त्वशील मालक श्री. व्यंकटराव पेंढारकर व त्यांच्या सुशील व

निष्टायंत मातुःश्री या उभयतांनीं माझ्या शब्दास मान देऊन या खेळाच्या रूपानें जी सद्गुरुबाबांची पुनरुपि बहुमोल सेवा केली, त्याबद्दल संस्थानसभेतर्फे मी त्यांचें प्रेमपुरःसर अभिनंदन करतों.

## भूषण

कोणतीही नाटक मंडळी प्रथमतःच घेण्यादेण्याचा ठराव करते व शंचशें रुपयांच्या आंत तर कोणास धर्मदाय नाटक देत नाहीं. या नाटक मंडळीच्या मालकांत जर कांहीं विशेष असेल तर तो हाच कीं, त्यांनीं मी त्यांना सांगपर्यंत देण्याघेण्याची गोष्ट मुळींच काढिली नाहीं व नाटक संपल्या-वर मी त्यांना जो आंकडा सांगितला तो त्यांनीं कबूल केला. ही गोष्ट त्यांस खरोखरच भूषणावह आहे. म्हणतात कीं, ऊंस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊं नये. परंतु पूर्वी याच मंडळीचा ऊंस आम्ही मुळासकट खाल्ला, पण त्याचीं पाळें फार खोल म्हणून त्याची आम्हांस न कळत पुन्हा वाढ होऊन या वेळीं त्याचा आम्हास पुन्हा आस्वाद चाखावयास सांपडला. श्रीसाइमाउ-लीची लीला अद्भुत ! कोणी सांगावें, कालांतरानें इज्या, बिज्या, तिज्या नाही होणार म्हणून !!

विश्वनाटकशास्त्रप्रणेते व सूत्रधार बाबांच्या पुण्यचरणीं नाटकवृत्तांत-लेखार्पण एरवींचा गारुडी प्रेक्षक जनांची खरी दृष्टि लपवून त्यांना एकाचे चार, खापरीच्या तुकड्याचे रुपये, आंब्याच्या कोइतून फळासह झाड, मुखां-तून अग्निज्वालांचे लोट, वगैरे अदृष्टपूर्व दृश्यें दाखवून त्यांस क्षणभर चकवतो. परंतु ज्याला दिसतील त्याच्या समोरील सृष्टि नाहींशी करून टाकणारे व ज्याच्यापासून स्वतःस लपवून ठेवतील त्याला सर्व सृष्टि सत्य भासविणारे इच्छा-मात्रेंकरून सर्वनाट्यनाटक वस्तूंच्या भूमिका आपणच घेऊन विश्वरंगभूमीही आपणच होऊन तीवर स्वतःच रात्रंदिवस नाचणारे, निमिषार्धांत अनंतकोटी ब्रह्मांडाची घडामोड करणारे, आपलें नाटक आपणच लपून पाहणारे, व इतकें करूनही त्यापासून अलिप्त राहणारे असे हे साइश्री ऐंद्रजाल गारुडी त्याच्या दिव्य चरणेंदीवरावर हा नाटकवृत्तांत त्रिदलरूपी वाक्पुष्कर अस्या-

दरपूर्वक अनन्यभावानें अर्पण करून त्यांना सहस्त्र साष्टांग प्रणिपात करून हा बराच लांबलेला लेख आटोपता घेऊन रजा घेतों.

## वृत्तांतप्रसिद्धीच्या विलंबाचें कारण

तिकिटांचे पैसे वसूल होण्यास फारच कलावधि लागला व अद्यापही कांहीं सद्गृहस्थांकडून रकमा येणें राहिल्या आहेतच. खर्चवेंच जाऊन बाबांच्या द्रव्यनिधीकडे या नाटकाप्रीत्यर्थ कमींत कमी रु. १००१ इतकी रक्कम गेलीच पाहिजे, असा मनःसंकल्प असल्यामुळें या रकमेंत कमी असलेल्या रकमेची भर घालून संकल्पित रक्कम पुरी करून कालातिक्रम झाल्यामुळें हा नाटकवृत्तांत आतां प्रसिद्ध करीत आहें.

पृथ्वीवृत्त ( द्व्यर्थी )

## शिरोव्यायाम

अहो नमन जाउं द्या विमल काय रामाकडे ।
अहो नमन जाऊं द्या विमल काय रामाकडे ।
न राम जगती न या भव अजाक साई विना ।
न राम जगती नया भव-अजा कसाई विना ।

ठाणें, ३-८-३३
श्रावण शु. १२ गुरुवार
शके १८५५.

संतपदरज दासानुदास
बाळकृष्ण विश्वनाथ देव,
विश्वस्त श्रीशिर्डी संस्थान.

पान २० वर हवाला दिलेलें परिशिष्ट पुढील पानावर छापलें आहे, तें कृपा करून वाचावें.

# परिशिष्ट

नाटक पाहण्यास न येतां नाटकास मदत म्हणून व भर घालण्याकरितां म्हणून ज्या कित्येक सद्गृहस्थांकडून व भगिनींकडून अल्पस्वल्प परिचूर्ण देणग्या आल्या त्यांची रक्कमवार नांवनिशी—

| क्रमांक | नांव | रक्कम रु. आ. पै |
| --- | --- | --- |
| १ | श्री. दादासाहेब येरवडेकर, पोलिस प्रॉसिक्युटर, ठाणें | १—०—० |
| २ | ,, अण्णासाहेब रुइकर, पर्सनल असि. इन्. टॅक्स क., ठाणें. | ५—०—० |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| ३ | ,, | लेले ( चि. रा. बसंतराव देव यांचे मित्र ), ठाणें | १-०-० |
| ४ | ,, | बलवंतराव धामणकर, लुगड्याचे व्यापारी, भिवंडी | ५-०-० |
| ५ | ,, | रावसाहेब काळे, चिटर्णीस, मुंबई सबर्बन जिल्हा, कलेक्टर | ५-०-० |
| ६ | ,, | गंगाराम भिकाजी कुळकर्णी, ठाणें | १-४-० |
| ७ | ,, | काशीनाथ पांडुरंग रेगे, ठाणें | १-४-० |
| ८ | ,, | विनायक दाजी भावे, तारमास्तर, मुंबई सेंटर, ठाणें | ४-२-० |
| ९ | ,, | रावसाहेब शेठ नरोत्तम गिरीधर तना, डहाणू | २-०-० |
| १० | ,, | शेठ गोवर्धन गिरधर तना, डहाणू | २-०-० |
| ११ | ,, | सौ. इंदिराबाई पेंढारकर उर्फ दुर्गाताई देवस्थळे, पेंढरे | ११-०-० |
| १२ | ,, | विष्णु गोविंद देव, रेंज फॉरेस्ट आफिसर, दौंड | ५-०-० |
| १३ | ,, | श्रीधर पांडुरंग देवस्थळ, कल्याण | ५-०-० |
| १४ | ,, | श्रीमती पार्वतीबाई ओझरकर, भाजे | ३-१२-० |
| १५ | ,, | सीताबाई कृष्णाजी बेलणकर, भाजे | १-०-० |
| १६ | ,, | वेणूताई अगाशे, ठाणें | ६-४-० |
| १७ | ,, | राधाबाई पेंढारकर, मुंबई | १-०-० |
| १८ | ,, | लक्ष्मीबाई किराण, सातारा | ८-१२-० |
| १९ | ,, | श्रीमती आनंदीबाई पंडित, पुणें | १-४-० |
| २० | ,, | सौ. रमाबाई देव, दौंड | २-८-० |
| २१ | ,, | सौ. कमलाबाई देव, ठाणें | २-०-० |
| २२ | ,, | सौ. उमाबाई देव, ठाणें | २-०-० |
| २३ | ,, | श्री. जयशंकर हरजीन मेथा, भांडुप | ३-४-० |
| | | | ८०-७- |

ठाणें **बाळकृष्ण विश्वनाथ देव**

आचार्य ह्मणती मालुराया । भक्तवत्सला महासदया । मी न वर मागावया । आलों जाण ये ठायीं ॥ ४७ ॥ मदीय सद्गुरु साक्षात्कारी । जन्मवासे खंदारीं । त्यावीण दैवतें दुसरीं । मान्य मशीं न सर्वथा ॥ ४८ ॥ साधुमहाराज शंकर । साधु महाराज रमावर । पूर्ण ब्रह्म निर्विकार । साधुमहाराज निश्चयें ॥ ४९ ॥ दुबळ्यापासीं पसरितां हात । याचक न होती कदा तृप्त । वर द्यावया मजप्रत । समर्थ माझे सद्गुरु ॥५०॥ ऐसें निरखून देवासी । आचार्य आले खंदाराशी । तें पाहून सद्गुरुसी । चोज वाटलें अतिशय ॥ ५१ ॥ पाहोनी शिष्याचा थोटा हात । मनीं द्रवले सद्गुरुनाथ । रात्रसमयीं तयाप्रत । बोलले महाराज यापरी ॥ ५२ ॥ माझे पाय दुखती भारी । त्वां चेपावे आपुले करीं । तेणें मसीं थोडा तरी । डोळा लागेल निश्चयें ॥ ५३ ॥ फार बरें ह्मणून । चेपूं लागले सद्गुरुचरण । एकया हातें करून । संताचार्य महाराज ॥ ५४ ॥ सेवेस नाहीं दुसरा हात । तेणें दुःख मनांत । झालें असे अनिवार सत्य । नयनीं लोटले दुःखाश्रु ॥ ५५ ॥ त्याचे भेंव पर्दी पडतां । साधुमहाराज तत्त्वतां । शिष्यास म्हणती श्रीमंता । कां रे रुदन करितोसी ॥ ५६ ॥ आचार्य म्हणती त्यावर । सेवेस नाहीं दुसरा कर । असेंच आतां जन्मभर । राहणें भाग गुरुराया ॥५७॥ हेतु जाणून शिष्याचा । तो कृपासमुद्र दीनाचा । कौतुक करिता झाला साचा । तें ऐका सावचित्तें ॥ ५८ ॥ शिष्याच्या थोट्या करावरुनी । फिरविला आपुला दिव्य पाणि । पाहतां कृपादृष्टीनीं । कर झाला पूर्ववत ॥ ५९ ॥ पूर्वीं गोऱ्या कुंभारासी । कर फुटले कीर्तनासी । तयाचे थोटेपणासी । निवटिता झाला पांडुरंग ॥ ६० ॥ तोच प्रकार झाला येथें । हात फुटला आचार्यातें । सद्गुरुनें आणिल्या हातें । काय होणें अशक्य ॥६१॥ हें ईशभक्तीचें बळ । उगाच नव्हे

पोरखेळ। जे अभक्त दुर्जन खळ। त्यां हें असत्य वाटेल कीं ॥ ६२ ॥ प्रसूतीच्या वेदनेप्रत। जैसी वांझ मानी असत्य। तैशा सद्भक्तांच्या कथा सत्य। अभक्ता असत्य वाटती ॥ ६३ ॥ अनुग्रह झाला सद्गुरूचा। अधिकार संतांचार्यांचा। उणीव यासी माझी वाचा। शक्य नूवे सर्वथा ॥६४॥ गोदेस मिळतां इतर जळ। तें गोदाच होय तात्काळ। तेथ न बुद्धीचें चाले बळ। निवड त्याची करावया ॥ ६५ ॥ आमरण पर्यंत। सद्गुरुसेवा केली सत्य। अखेर उंबरखेडांत। दिली समाधि सद्गुरुसी ॥६६॥ समाधीच्या खर्चासाठीं। जहागीर मिळविली अ मोठी। करूनियां खटपटी। चंदुलालापासुनी ॥६७॥ स्वराज्याचेवां च धर्मकृत्या न मिळे मान। स्वसत्तेचे वांचून! अवघीं कृत्यें बापुडी ॥ ६८ ॥ पूर्वेस बोधन इंदूर। निजामाबाद नामें शहर। येथें बांधि मंदीर। आचार्यांनीं दत्ताचें ॥ ६९ ॥ करून आत्मानात्म विचार। दे ठेविला अखेर। तया माझा नमस्कार। आदरें हा साष्टांगीं ॥ ७० ॥ स्वस्ति श्रीसंतकथामृत। परिसोत अवघे भाविक भक्त। भाविकां आज्ञांकित। आहे साच दासगणू ॥ ७१ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥

॥ इति सप्तदशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय १८

श्रीगणेशायनमः । ॐनमोजी उदारा । शिवप्रिया गौरीकुमरा । चतुर्भुज दयासागरा । सर्वांच्या गणपती ॥ १ ॥ आतां श्रोते अवधारा । आपुल्या चित्ता शुद्ध करा । ईसक्षींग्रन्थार्थे करा । या ग्रंथाचें सेवन ॥२॥ महाराष्ट्रीं नांदेड जिल्ह्यांत । खंदार गांव विख्यात । तेथें साधुवंशांत । रुक्मांगद जन्मले ॥ ३ ॥ त्यांची कथा परम पावन । तुम्ही ऐका हो श्रोतेजन । ग्रंथीं भाव ठेवून । श्रवणीं सादर बैसावें ॥ ४ ॥ जेंवी जाण तेंवीं माती । बीज तैसीं फळें येती । आम्रवृक्षाचियाप्रती । येतील कैसीं वृंदावनें ॥ ५ ॥ साधुमहाराज आजे यांचे । जे अवतार नाथाचे । त्याचिया चरित्राचें । श्रवण मागें केलें तुम्ही ॥ ६ ॥ रुक्मांगदाची निस्पृहता । नये मजसीं वर्णितां । एक रिसाल्दार होता । खंदारीचा श्रीमंत ॥ ७ ॥ रजपुत राजा गेल्यावर । त्यास ती तनखा जहागिर । मिळालीसे साचार । आनंद झाला तयासी ॥ ८ ॥ तो येऊन एके दिनीं । बोलला कर जोडूनी । महाराज आपणांलागूनी । काय पाहिजे सांगावें ॥ ९ ॥ गांव वा इनाम मोकासा । कोणत्याची आहे आशा । ती सांगणें पुण्यपुरुषा । देण्यास मी तयार ॥ १० ॥ तैं रुक्मांगद देती प्रत्युत्तर । समर्थ माझा रुक्मीणीवर । त्यापुढे तूं पामर । देशी काय कळेना ॥ ११ ॥ आम्ही ईश्वराचे दास । याचना न करूं मानवास । सानंदसुखाचा आम्हास । त्यानें इनाम दिधला ॥ १२ ॥ त्या इनामाचे पुढती । नाहीं कशाची जाण महती । यजमान आमुचा रमापती । काज पडल्या मागूं तया ॥१३॥ ऐसे परिसतां बोल निर्वाण । रिसालदार झाला खिन्न । बळेंच सनद लिहून । सवाशाची टाकिली पुढें ॥ १४ ॥ रुक्मांगद त्या सनदेप्रत । न इच्छिती लावण्या हात । टाकून द्या ही

उकीरड्यांत। ऐसें बोलूं लागले ॥ १५ ॥ याचें नांव निरपेक्षता। लक्ष्मी मोह ज्याचे चित्ता। करण्या थोड्याही आघाता। समर्थ नसे सूज्ञ हो ॥ १६ ॥ असो रुक्मांगदाचा शिष्य एक। असे परम भाविक। कासार त्याची जात देख। नाम यादू जयाचें ॥ १७ ॥ तो पदें होता पांगळा। तैसाच डोळ्यांनीं आंधळा। त्यायोगें कंटाळा। करूं लागले आप्तवर्ग ॥ १८ ॥ हा खाया काळ भूमीस भार। धोंडाच आमुच्या उरावर। याचें महें सर्वेश्वर। कधीं उचलील कळेना ॥ १९ ॥ जो मनुष्य अवयवहीन। तो जीवंत असून मेल्यासमान। सुखाचे सोबती सुहृद्गण। संकटसमयीं कोणी नसे ॥ २० ॥ दुबळा भणंग भिकाऱ्यास। साधूच देती आश्रयास। यादु राहिला मठास। वसमतीं भास्करभाऊंच्या ॥२१॥ श्रोते कर टाळ्या वाजविती। जयजय विठ्ठल भजन करिती। आणीक दृष्टींनीं अवलोकिती। उत्सवाचा सोहळा ॥ २३ ॥ तैं यादू कासार। मनीं झाला खिन्न फार। रुक्मांगदाचें वारंवार स्मरण करूं लागला ॥२४॥ हे रुक्मांगदा सौख्यधामा। सद्भक्ताच्या कल्पद्रुमा। सज्जनांच्या विश्रामा। कां रे उपेक्षा करितोसी ॥२५॥ मदीय डोळे हात पाय। गेले कीं हे गुरुराय। त्यावांचून मी पाहा। मृतवत झालों भूमंडळीं ॥ २६ ॥ गुरुकृपेचें महिमान। ग्रंथांतरीं ऐकिलें पूर्ण। त्याचें प्रत्यक्ष प्रमाण। कां न यावें मजप्रती ॥२७॥ किंवा मी तव कृपेप्रती। योग्य नव्हे हे गुरुमूर्ती। म्हणून पंगू मसीं जगतीं। ठेविलें त्वां दयाळा ॥ २८ ॥ लोक अवघे आनंदांत। मी तेवढा दुःखित। माझा गुरू तूं समर्थ। असून कां ऐशी दशा ॥ २९ ॥ यासाठीं धांव घेई। हे माझे गुरुमाई। नाहीं अशक्य तुला पाहीं। माझे कोड पुरविणें ॥ ३० ॥ ऐसा धांवा ऐकूनी। रुक्मांगद प्रकटले त्या स्थानीं। शिष्याचा कर धरूनी। बोलूं लागले दयाळ ॥ ३१ ॥ जा जा

कठ भजनासी । कां रे ऐसा बसलासी । निज दृष्टीनें सोहळ्यासी । पाहीं जाऊन उत्सवा या ॥ ३२ ॥ ऐसें बोलोन तयाप्रत । अंगावरून फिरविला हात । आली दृष्टि अकस्मात । तेधवां त्या यादूला ॥ ३३ ॥ पंगूपण अवघें गलें । हातपाय बरे झाले । चालतां येऊं लागलें । एका क्षणामाझारीं ॥३४॥ पाहोनी रुक्मांगदाची मूर्ती । आनंद झाला यादूप्रती । डोयी ठेविली पायांवरती । अष्टभाव दाटले ॥ ३५ ॥ त्यासी आशिर्वाद देऊन । रुक्मांगद पावले अंतर्धान । महाराज साक्षात नारायण । मानवरूपीं अवतरले ॥ ३६ ॥ डोळे हात पाय आल्यावर । करूं लागला व्यापार । वसुमती तो कासार । अगाध ऐशी गुरुकृपा ॥ ३७ ॥ महाराजांचा तृतीय कुमर । देवीदास साचार । त्याचे पायींचे अलंकार । चोरीस गेले एके दिनीं ॥ ३८ ॥ ती मुलाची पैंजण चोरी । केली बाळकृष्णें खरी । तपास अवघ्या मठांतरी । केला परी ना थांग लागे ॥ ३९ ॥ जो तो झाला चिंतातुर । न उमगल्या हा चोर । आळ राहील अवघ्यांवर । अक्षयींचा निश्चयें ॥ ४० ॥ ही चिंता हरण्यातें । कौतुक केलें सद्गुरुनाथें । तें ऐका हो सावचित्तें । तुम्ही श्रोते उदार ॥ ४१ ॥ ज्यानें पैंजणाची चोरी । केली असेल साजिरी । तस्करा कोड निर्धारीं । फुटेल वदले महाराज ॥ ४२ ॥ तेंच पहा झालें सत्य । कोड बाळकृष्णाप्रत । फुटला झाला लज्जित । वदन न दावी कवणातें ॥ ४३ ॥ रुक्मांगद त्यातें म्हणती । उगी आतां न करीं खंती । कृतकर्माचें निश्चितीं । तुज फळ मिळालें ॥ ४४ ॥ ऐशा अनंत करून लीला । शके अठराशें चहूंला । कार्तिक वद्य नवमीला । गेले महाराज वैकुंठीं ॥ ४५ ॥ असो स्वामींचे पुत्र यशवंतबुवा । यांचाही अधिकार बरवा । येविषयींचा ऐकावा । इतिहास श्रोते थोडका ॥४६॥ यशवन्तकांता अंबाबाई । गरोदर

जाहली पाहीं। पांचवे मासीं झालें। कांहा तें सांगतों ॥ ४७ ॥ गर्भ अपक्व पतन झाला। त्यानेंच तिचा अंत केला। निधनसंस्कार दहाला। करिते झाले सतीच्या ॥ ४८ ॥ तैं त्या खंदार नगरीं। होता गणोबा केसरी। तो बोलला चवाठ्यावरी। अद्वातद्वा यथामती ॥ ४९ ॥ आज साधुच्या मठांत। अंबाबाई झाली मृत। तिची सूतिका शुद्धिसत्य न करितां जाळिती ती ॥ ५० ॥ हें कर्म अनुचित। आहे धर्मशास्त्रा विहित। ते झाले मठांत। बोल कोणा लावाला ॥ ५१ ॥ शिंगें मोडून वासरांत। शिरूं पाहती सूज्ञ सत्य। धर्मशास्त्रा न जाणिती संत। टाळ कुटिती सर्वकाळ ॥ ५२ ॥ तें केसरीचें भाषण। कळलें यशवंता लागून। गणोबा घ्यावा दर्शन। येतां मठासी बोलले त्या ॥ ५३ ॥ आम्हीं न सूतिकाशुद्धि केली। याची चर्चा बरीच झाली। आम्हां ठेंच लागली। तुम्हीं सावध असावें ॥ ५४ ॥ हाच प्रसंग तुम्हांवरी। चार दिवसांनीं निर्धारीं। येणार तेव्हां खबरदारी। घ्या हो निंदा करूं नका ॥ ५५ ॥ जें जें कांहीं बोलती संत। तें तें सत्य करितो रमानाथ। गणोबाची कांता झाली मृत। खचित चार दिवसांनीं ॥ ५६ ॥ तें पाहतां गणोबासी। दुःख झालें मानसीं। आलेलिया प्रसंगासी। सादर झाला धैर्य बळें ॥ ५७ ॥ संतांची ती टवाळी। करूं नये सहसा भली। त्यांचा पाठिराखा वनमाळी। उसने घेत तयांचें ॥ ५८ ॥ करून कांतेचा दिवस मास। गणोबा आले मठास। येतांच यशवंतबुवास। दंडवत त्यांनीं घातला ॥ ५९ ॥ मीं जें कांहीं चवाट्यावरी। भाषण केलें निर्धारीं। कुटिलत्वाचा अंतरीं। नव्हता भाव महाराज ॥ ६० ॥ संत निंदेचें फळ पावलों। विधुर होऊनि बैसलों। संसारसुखास आंचवलों। आतां द्वितीय लग्न कशाचें ॥ ६१ ॥ महाराज म्हणती त्यावर। बरें करील सर्वेश्वर। संत आशीर्वाद

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धी द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला**

अत्यंत उपयोगी

# ब्राह्मी तेल

श्री